| MHKO160001342020 | नियमित दिवाणी दावा क्र. २२/२०२० मधील निशानी क्र १८ वरील आदेश |
|---|---|

०१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज आणि सोबतचे प्रतिज्ञापत्र दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६ नियम १७ अन्वये वादपत्रमध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. वादी यांनी प्रस्तुतचा दावा कायम मनाईसाठी दाखल केला आहे. वादीचे असे कथन आहे की, वादी यांनी नि.१४ वर प्रतिवादीं विरूध्द दि.१७/०७/२०२० रोजी स्टेटसको ठेवणेसाठी अर्ज दिला असून तो मंजूर झालेला आहे. असे असताना देखिल प्रतिवादीं यांनी शेडचे बांधकाम दावा मिळकतीत केले आहे. वादी यांनी मे. कोर्टाचा हुकूम सांगुन शेड उभा थांबविणेची विनंती करूनही प्रतिवादी नं १ चे पती यांनी ग्रा.पं. ला नोंद ही घालणार अशी भाषा केली आहे. प्रतिवादीं यांनी मे. कोर्टाचे आदेशाचा अवमान करून शेडचे बांधकाम केले आहे व नुकतीच गवताची गंजी रचलेली आहे. सदरचे प्रतिवादीं यांचे कृत्याने वादींचे दाव्याचा मुळ हेतू संपुष्टात यंणार आहे. त्यामुळे वादी यांनी दावेचे टायटलमध्ये दावा कायम मनाईचे पुढे दावा मँडेटरी मनाईचा व ज्यु.रू.१०००/- चे ऐवजी रू.२०००/-प्रमाणे दुरूस्तीस परवानगी मिळावी, तसेच वर नमूद प्रमाणे प्रतिवादी यांनी दावा जमीनीत बेकायदेशीररित्या शेड उभे केले आहे, गवत गंजी रचलेली आहे, ती काढून टाकणेसाठी व खुली जागा मिळणेसाठी वादींनी मँडेटरी मनाईची मागणी करणेबाबत अर्ज मंजूर व्हावा यासाठी सदरचा अर्ज केला आहे.

०३. प्रतिवादीं यांनी सदर अर्जास म्हणणे दिलेले आहे. प्रतिवादीं यांनी असे कथन केले आहे की, चुकीचा व काल्पनिक आहे. वादी कथन करतात ते प्रतिवादींचे शेड दावा दाखल करणेपूर्वीपासूनचे आहे व सदरची बाब वादीस माहित असतानाही मे. कोर्टाचे कडून मनाईचा आदेश घेवून वादी कथन करतात त्या प्रतिवादींचे शेडमध्ये घुसणेस पाहात आहेत, तथापि वादीस यश न मिळाल्याने वादीने सदरचे खोट्या मजकुराचे अर्जाची रचना केली आहे. वादी मागतात तशी दुरूस्ती करता येणार नाही, तरी वादीचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे. तसेच, वैकिल्पिकरित्या सदरचा अर्ज मंजूर करणेचा झाल्यास वादीवर रू.५,०००/- खर्च बसविणेत यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

०४. मी वादी, प्रतिवादीं यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अभिलेखावरील कागदपत्रे, वादी आणि प्रतिवादीं यांचे वादपत्र यांचे अवलोकन केले आहे. वादी यांनी प्रस्तुतचा दावा मिळकतीचे कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादी यांचे मते वादी यांनी नि.१४ वर प्रतिवादीं विरूध्द दि.१७/०७/२०२० रोजी स्टेटसको ठेवणेसाठी अर्ज मंजूर असून सुध्दा प्रतिवादी यांनी शेडचे बांधकाम दावा मिळकतीत केले असे कथन केले आहे. तसेच, प्रतिवादी नं १ चे पती यांनी ग्रा.पं. ला नोंद ही घालणार अशी भाषा केली आहे. तसेच प्रतिवादीं यांनी मे. कोर्टाचे आदेशाचा अवमान करून शेडचे बांधकाम केले आहे व नुकतीच गवताची गंजी रचलेली आहे असे कथन केले आहे. सदरचे प्रतिवादीं यांचे कृत्याने वादींचे दाव्याचा मुळ हेतू संपुष्टात येणार आहे. तसेच, प्रतिवादीने उभ्या केलेल्या शेडबाबत व त्यामध्ये वाहने व जनावरे बांधू लागला याबाबतचा मजकुर वादी यांना दाव्यामध्ये समाविष्ट करायचा आहे. सदरचे शेड उभारणी ही स्टेटसको ऑर्डरच्या नंतर झाल्याचे वादी यांनी कथन केले आहे. त्यामुळे सदरची दुरूस्ती मागितलेली आहे. वादी यांची सदरची नवीन उद्भवलेल्या घटनांचा मजकुर वादी दाव्यात समाविष्ट करू इच्छीतात व तो दाव्याचा अंतिम निकाल लागण्यासाठी महत्वाचा आहे. वादी यांचे अर्जाचे स्वरूप पाहता तो मंजूर झाल्यास दाव्याचे मुळ स्वरूपावर कोणताही बदल होणार नाही. वादी यांनी अर्जामध्ये नमूद केलेली दुरूस्ती ही वादी आणि प्रतिवादी यांचेदरम्यानचा मुख्य वाद निकाली करण्यासाठी आवश्यक आहे. तसेच, एकाच दाव्यामध्ये दोन्ही पक्षकारांचे सर्व मुद्दे निकाली निघणे गरजेचे आहे. सदर दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी व सदर दाव्यात विविध निरनिराळे वाद टाळण्यासाठी सदरची दुरूस्ती मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, वर नमूद कारणांवरून वादी यांची अर्जातील विनंती मान्य करण्यास पात्र आहे असे स्पष्ट होत आहे. सबब, वर नमूद निष्कर्षास अनुसरून मी खालील आदेश करीत आहे.

## आदेश

०१ अर्ज नि. १८ मंजूर करण्यात येत आहे.

०२. वादी यांनी प्रतिवादीं यांना रक्कम रू.२००/- द्यावे या अटीवर वादी यांना वादपत्रामध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे आणि वादी यांनी अर्जामध्ये नमूद दुरूस्ती १४ दिवसांचे आत करावी आणि दुरूस्त दावा प्रत न्यायातयात दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by AMOL SHRIRAM SHINDE
Date: 2022.07.13 11:11:17 +0530

दिनांक- १२/०७/२०२२

( अमोल श्रीराम शिंदे )
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
मलकापूर-शाहूवाडी